तद्नंतर केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाने दि. १७/११/२०१५ च्या पत्रान्वये त्यांचे दि. १८/५/२०११ च्या परिपत्रकामध्ये आणखी सुधारणा करुन दि.१८/५/२०११ च्या परिपत्रकामधील परिच्छेद १(बी) खाली दुसरे परंतुक खालीलप्रमाणे समाविष्ट केले आहे.

"Wherever building structures of four storeys or more already exist within 500 meters of the periphery of any Defence establishment and the construction proposed is in line with or behind i. e. in the shadow or shield of such building/ structure, the State Government / Municipal Corporation may, after obtaining comments from the LMA and giving due consideration to the same decide whether to approve such proposals or not. LMA shail give his comments within a period of 30 days from the date of receipt of a reference from the State government / Municipal Corporation. This order will be impiemented prospectively."

संरक्षण विभागाने दि. १८/५/२०११ नंतर दि. १८/३/२०१५ व दि.१७/११/२०१५ रोजीची निर्गमित केलेली पत्रे विचारात घेऊन, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरण / विशेष नियोजन प्राधिकरण तसेच जिल्हाधिकारी यांना शासनाने दि. २१/२/२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनामधील अ.क्र. ई नंतर खालीलप्रमाणे आणखी मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

फ) दि.१८/५/२०११ पूर्वी सबंधित नियोजन प्राधिकरणाने किंवा विशेष नियोजन प्राधिकरणाने किंवा संबंधित जिल्हाधिकारी यांनी बांधकाम परवानगी / विकास परवानगी दिली असेल अशा प्रकरणी L.M.A./ संरक्षण आस्थापनाकडून ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. मात्र दि. १८/५/२०११ नंतर त्या बांधकामाच्या / इमारतींच्या उंचीमध्ये वाढ असल्यास त्यासंदर्भात संरक्षण विभागाच्या दि. १८/५/२०११ रोजीच्या पत्रामध्ये नमूद विहीत मार्गदर्शक तत्वे / कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

ग) संरक्षण विभागाच्या आस्थापनाच्या ५०० मी. परिघात जेथे चार मजली किंवा त्यापेक्षा जास्त मजले असलेल्या इमारती / बांधकामे अस्तीत्वात आहेत आणि या रेषेमधील किंवा त्यापलिकडे म्हणजेच त्या इमारतीच्या / बांधकामाच्या पडछायेमध्ये जर बांधकाम प्रस्तावित असेल तर अशा बांधकामांकरिता संबंधित संरक्षण विभागाच्या सक्षम प्राधिका-याकडून मत प्राप्त करुन घेऊन आणि ते विचारात घेऊन, गुणवतेवर प्रस्ताव मंजूर करणेबाबतचा/नामंजूरीबाबतचा निर्णय घ्यावा. संबंधित संरक्षण विभागाच्या

सक्षम प्राधिका-याने त्यांचे मत असा संदर्भ संबंधित नियोजन प्राधिकरण /विशेष नियोजन प्राधिकरण /जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात दयावे.

उपरोक्त वाढीव मार्गदर्शक सुचना तात्काळ अंमलात येतील व त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

(डॉ.नितिन करीर)
**प्रधान सचिव** (नवि-१).

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :-**

१) सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना माहितीसाठी आणि आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

२) संचालक (एल ॲण्ड सी) संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

३) एयर ऑफीसर कमांडींग, एचक्यू, मेरीटाईम ,एयर ऑपरेशन, आय.अे.एफ. बिल्डींग, महात्मा गांधी रोड, न्यू मरीन लाईन, मुंबई -४०० ०११.

४) अेव्हीएसएम, व्हीएसएम, फ्लॅग ऑफीसर कंमाडीग इन चिफ, वेस्टन नेव्हल कमांड, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई.

५) जनरल ऑफीसर कमांडींग हेड क्वॉर्टर्स, महाराष्ट्र ॲण्ड गुजरात एरीया,कुलाबा, मुंबई-४०० ००५.

६) प्रधान सचिव, ऊदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई.

९) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हाधिकारी आणि इतर सर्व संबंधिताचे निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

१०) सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई.

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, अंधेरी (पुर्व), मुंबई.

१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला संकूल, बांद्रा (पुर्व), मुंबई.

१४) आयुक्त, बृहन्मुंबई /ठाणे/ उल्हासनगर/कल्याण –डोंबिवली/नवी मुंबई/ मिरा भाईंदर/वसई-विरार/भिवंडी-निजामपूर/ नाशिक/ मालेगांव/ पिंपरी-चिंचवड/ पुणे/ सांगली-मिरज-कुपवाड/ सोलापूर/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ नांदेड-वाघाळा/अकोला/ अमरावती/ नागपूर/जळगांव/ अहमदनगर/धुळे/ परभणी/ लातूर/ चंद्रपूर.

१५) आयुक्त तथा संचालक, नगपरिषद प्रशासन संचालनालय, शासकीय परीवहन सेवा इमारत, तिसरा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व नगरपालिका व नगर पंचायत मुख्याधिकारी तसेच इतर सर्व संबंधिताचे निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

१६) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पुणे.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधिताचे निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : ४ फेब्रुवारी, २०१६

परिपत्रक

क्रमांक: सिआरझेड-१२१५/१०९३/प्र.क्र.४०/१५/नवि-१२

विषय :- संरक्षण विभागाचे आस्थापनांचे सभोवताली बांधकाम कार्याचे नियंत्रणासाठी मार्गदर्शक सुचना.

संदर्भ :- शासन, नगर विकास विभागाचे परिपत्रक क्र. सिआरझेड-२०१२/प्र.क्र.२/१२/नवि-१२, दि. २१/२/२०१५

संरक्षण विभागाच्या आस्थापनांलगतच्या जमिनीच्या विकासासंदर्भात संरक्षण विभागाने दि. १८/५/२०११ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना, तद्नंतर स्थलसेनेने दि. ३/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेले स्पष्टीकरण आणि संरक्षण विभागाचे एका प्रकरणी दिलेले दि. १४/१/२०१३ रोजीचे पत्र विचारात घेऊन, संरक्षण विभागाच्या मार्गदर्शक तत्वांची एकसमान (uniform) अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने व त्यामध्ये सुसुत्रता राहण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने यापुर्वी दि. ४/११/२०१० च्या पत्रान्वये केवळ बृहन्मुंबई क्षेत्रापुरते निर्गमित केलेले पत्र रद्द करुन, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे/ विशेष नियोजन प्राधिकरणे तसेच जिल्हाधिकारी यांना सर्वसमावेशक अशा मार्गदर्शक सुचना संदर्भाधिन परिपत्राकाद्वारे शासनाने दिल्या आहेत.

केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाने दि. १८/३/२०१५ च्या पत्रान्वये, त्यांचे दि. १८/५/२०११ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये सुधारणा केली असुन, परिच्छेद १(बी) खाली खालीलप्रमाणेचे परंतुक समाविष्ट केले आहे.

"NOC from LMA/ Defence Establishment would not be required in respect of a construction for which permission had been issued by the competent local municipal authority prior to 18/5/2011 (date of circular). However, this proviso shall not apply to any amendment to the said construction permission with regard to height, if such amendment has been allowed after 18/5/2011."